वृत्तपत्र वार्ता

# चंद्रपूर प्रकल्प च्या संच क्र.८(५०० मे.वॅ) चे 'बॉयलर प्रदिपन' संपन्न

चंद्रपूर प्रकल्प (२×५०० मे.वॅ) च्या संच क्र.८ चे 'बॉयलर प्रदिपन' दि.३० मार्च २०१४ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. याच बरोबर महानिर्मिती प्रकल्पातील मैलाचा दगड म्हणून गणल्या जाणा-या टप्प्यातील बॉयलर प्रदिपन ची प्रक्रीया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. संच क्र ८ चे क्रियान्वयन (synchronization) मे २०१४ मध्ये अपेक्षित आहे. हा संच पूर्ण क्षमतेने जुलै २०१४ मध्ये कार्यान्वित होणे अपेक्षीत आहे. चंद्रपूर प्रकल्पातील संच क्र.९ चे काम सुध्दा वेगाने प्रगतीपथावर असून त्याचे देखील बॉयलर प्रदिपन जुलै २०१४ मध्ये अपेक्षीत आहे. चंद्रपूर प्रकल्पातील संच क्र. ८ व ९ चे पूर्णपणे क्रियान्वयन झाल्यानंतर महानिर्मितीच्या वीज निर्मितीमध्ये १००० मे.वॅ. ची भर पडेल.

तत्पूर्वी दि.२९ मार्च २०१४ रोजी श्री.आशीष शर्मा, मा.व्यवस्थापकीय संचालक (महानिर्मिती) यांनी प्रकल्प स्थळी भेट देउन बॉयलर लाईट-अपच्या पूर्वतयारी ची पाहणी करुन मार्गदर्शन केले व त्यांच्या हस्ते बॉयलर प्रदिपनाची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

दि.३० मार्च २०१४ रोजी दु.१ वा. ५० मि.नी मा.श्री वसंत खोकले, मुख्य अभियंता, चंद्रपूर प्रकल्प यांच्या हस्ते नियंत्रण कक्षातून बॉयलर प्रदिपन करण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे सर्व संयंत्राचे कार्यान्वयन थेट नियंत्रण कक्षातून कळ दाबून करण्यात आहे. या प्रसंगी श्री.प्रदीप शिंगाडे, मुख्य अभियंता, (बांधकाम),कोराडी, श्री.दामोदर पुजारी, उपमुख्य अभियंता, स्थापत्य बांधकाम मंडळ, चंद्रपूर श्री.अभिजित कुलकर्णी, उपमुख्य अभियंता (प्रभारी), चंद्रपूर प्रकल्प, श्री.प्रितम देशकर, अधिक्षक अभियंता, (चाचणी), भुसावळ, श्री.नरेन्द्र गुप्ता, सहाय्यक महाव्यवस्थापक, बीएचईएल, चंद्रपूर, श्री. राजेन्द्र एरन, उपाध्यक्ष, मे.बीजीआर चंद्रपूर प्रकल्प व चंद्रपूर प्रकल्पातील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री.वसंत खोकले यांनी महानिर्मितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी आणि कंत्राटदार व त्यांचे कर्मचारी यांचे मन:पूर्वक आभार मानले. महानिर्मितीचे मा.व्यवस्थापकीय संचालक, मा. संचालक(प्रकल्प) व मा.कार्यकारी संचालक(प्रकल्प) यांनी चंद्रपूर प्रकल्पातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.